पोलिस निरीक्षक येवला शहर पो.स्टे.ना.ग्रा.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** येवला शहर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0135 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/05/2022 02:58 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 18/05/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/05/2022

**Time From (वेळेपासून):** 17:04 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:10 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/05/2022 **Time (वेळ):** 02:40 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/05/2022 02:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 3 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** दुय्यम निबंधक कार्यालय , येवला ,येवला

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** दिलीप शंकर शिंदे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | वेळापुर पाचोरे बु ,निफाड ,येवला शहर,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | वेळापुर पाचोरे बु ,निफाड ,येवला शहर,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रणजित शिवसिंग गुशिंगे | | | 1. बदापुर रोड ,वल्लभनगर ,येवला ,येवला , येवला शहर,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि येवला शहर पोलीस स्टेषन, नाशिक ग्रामीण

दिनांक 19/05/2022मी दिलीप शंकर शिंदे, वय - 31 वर्षे, व्यवसाय - वकील, राहणार- मु.वेळापुर, पो.पाचोरे बुद्रूक, ता.निफाड, जि.नाशिक. मोबाईल नंबर - 9423078024.समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुबियांसह राहत असुन निफाड न्यायालय व येवला न्यायालयात वकीली व्यवसाय करतो. मी दिनांक 18/05/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल बागुल, षासकीय पंच व इतर स्टाफ यांची आसरा लन्स समोर, तहसिल कार्यालय जवळ, येवला अहमदनगर महामार्ग, येवला जि. नाशिक येथे भेट घेवुन परिचय करून घेतला. त्यानंतर पंचांसमक्ष मी माझी तोंडी तक्रार सांगुन व स्वःहस्ताक्षरात लिहुन दिली की, माझे पक्षकार श्रीमती अंजना सज्जन शेजवळ, राहणार - लासलगांव व पक्षकार श्री.विषाल माणिक शेळके, राहणार - आडगांव रेपाळ, ता.येवला यांचे शेतजमीनीचे संदर्भातील मा.न्यायालयाने दिलेला हुकुमनामा (आदेश) फाईलिंग होवुन सुचि क्र.2 मिळणेकामी मी दुय्यम निबंधक कार्यालय, येवला, जि.नाशिक येथे दिनांक 11/01/2022 रोजी अर्ज व त्यासंबंधीचे कागदपत्र जमा केले होते. सदरचे कागदपत्र ताब्यात घेणेकामी दोन्ही पक्षकारांनी मला अधिकारपत्र दिलेले होते. मी अर्ज देवुन बरेच महिने होवुन गेले तरी माझे पक्षकार यांचे हुकुमनामा फाईलिंग होवुन सुचि क्र.2 न मिळाल्याने मी दिनांक 17/05/2022 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, येवला, जि.नाषिक येथे जाऊन संबंधीत लिपीक श्री.रणजित गुषिंगे यांची भेट घेतली असता त्यांनी मला सांगितले की, मी तुमच्या दोन्ही प्रकरणातील हुकुमनामा फाईलिंग करून सुचि क्र.2 काढुन देतो, त्या मोबदल्यात मला 4,000/- रूपये दयावे लागतील. नाही तर तुमचे काम होणार नाही असे म्हणुन माझेकडे लाचेची मागणी केली. मला दुय्यम निबंधक कार्यालय, येवला जि.नाशिक येथील लिपीक श्री. रणजित गुशिंगे यांना लाच देण्याची ईच्छा नसुन त्यांच्यात व माझ्यात कोणताही आर्थिक अगर उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच आमच्यात भांडण तंटा नाही. तरी लिपीक श्री. रणजित गुशिंगे यांच्यावर कायदेषीर कारवाई होणेबाबत मी दिनांक 18/05/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथील पोलीस निरीक्षक श्री.अनिल बागुल यांचेकडे शासकीय पंचांसमक्ष माझी वरील प्रमाणे स्वःहस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली. सदर तक्रारीवर मी सही केल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बागुल व पंचांनी सहया केल्या आहेत. मी दिलेल्या तक्रारीनुसार दुय्यम निबंधक कार्यालय, येवला, जि.नाशिक येथील लिपीक श्री.रणजित गुशिंगे हे खरोखर माझ्याकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता पोनि श्री.बागुल यांनी व्हाईस रेकर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हईस रेकर्डर चालु करून मला पंच श्री.राजेंद्र मोरे यांचे सोबत लिपीक श्री.रणजित गुशिंगे यांचे भेटीसाठी दुय्यम निबंधक कार्यालय, येवला, जि.नाशिक येथे जाण्यासाठी माझे जवळील मोटार सायकलने आसरा लन्स समोर, तहसिल कार्यालय जवळ, येवला- अहमदनगर रोड, येवला, जि. नाशिक येथुन रवाना केले. त्यानंतर मी व पंच श्री.राजेंद्र मोरे असे दुय्यम निबंधक कार्यालय, येवला येथे पोहचल्यानंतर मी, पंच श्री.राजेंद्र मोरे यांचेसह लिपीक



Scanned with CamScanner

श्री.रणजित गुशिंगे यांची भेट घेतली. आमच्यात झालेल्या चर्चेदरम्यान लिपीक श्री.रणजित गुशिंगे यांनी दोन्ही प्रकरणांचे दोन-दोन हजार रूपये दयावे लागतील असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच श्री.राजेंद्र मोरे असे पो.नि.बागुल व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत पोहचल्यानंतर मी व पंच श्री.राजेंद्र मोरे त्यांना केलेपासुन ते परत येईपावेतो घडलेल्या घटनेबाबत कथन केले. त्यानंतर पो.नि. बागुल व पथकाने व्हईस रेकर्डरमध्ये माझ्यात व श्री.लिपक श्री.रणजित गुशिंगे यांचेत झालेले संभाषण ऐकल्यानंतर लिपीक श्री.रणजित गुशिंगे यांनी माझ्याकडे श्रीमती शेजवळ व श्री.शेळके यांचे प्रकरणातील हुकुमनामा फाईलिंग करून सुचि क्र.२ काढुन देण्याच्या मोबदल्यात 4,000/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याची खात्री झाली. त्यानंतर लिपीक श्री.रणजित गुशिंगे यांनी 4,000 /- रूपये लाचेची रक्कम लागलीच मागितली असल्याने पोनि बागुल यांनी मला लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितली. त्यावेळी मी माझ्याकडील बचतीमधील असलेले 500/- रू. दराच्या 08 चलनी नोटा असे एकुण 4,000/- रूपये पोनि श्री. बागुल यांचेसमक्ष हजर केले. त्यानंतर सापळा पथकातील पोना/अहिरराव यांनी अँथ्रासिन पावडर व अ.ला. दिव्याचे प्रात्यक्षिक करून दाखवुन मी हजर केलेल्या नोटांना दोन्ही बाजुने अँथ्रासिन पावडर लावुन सदर नोटा माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पोनि श्री. बागुल यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि श्री.बागुल यांनी व्हईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून माझेजवळ दिले. त्यानंतर पोनि श्री.बागुल यांनी मला पंच श्री. राजेंद्र मोरे यांचे सोबत लिपीक श्री.रणजित गुशिंगे यांचे भेटीसाठी दुय्यम निबंधक कार्यालय, येवला, जि.नाशिक येथे जाण्यासाठी माझे जवळील मोटार सायकलने आमरा लान्स समोर, तहसिल कार्यालय जवळ, येवला- अहमदनगर रोड, येवला, जि. नाशिक येथुन रवाना केले. त्यानंतर मी व पंच श्री.राजेंद्र मोरे दुय्यम निबंधक कार्यालय, येवला येथे पोहोचलो. त्यावेळी पोनि श्री. बागुल, पंच श्री. सुनिल ओसवाल व सापळा पथक आमचे पाठोपाठ येवुन कार्यालयात कामानिमित्त आलेल्या लोकांच्या गर्दीत अस्तित्व लक्षात येणार नाही अशा प्रकारे उभे राहुन सापळा आयोजित केलेला होता. श्री. रणजित गुशिंगे व माझ्यात चर्चा चालु असतांना मी अ.पा.लावलेली 4,000/- रूपये लाचेची रक्कम उजवे हाताने शर्टचे पुढील बाजुचे डाव्या खिशातुन काढुन लिपीक श्री. रणजित गुशिंगे यांचेसमोर धरून म्हटलो की, भाऊसाहेब हे तुम्ही सांगितल्याप्रमाणे दोन डाक्युमेंटचे प्रत्येकी दोन हजार, हे चार हजार रूपये मोजुन घ्या. त्यावर लिपीक श्री.रणजित गुशिंगे म्हणाले की, काही हरकत नाही. त्यानंतर लिपीक श्री.रणजित गुशिंगे यांनी त्यांचे डाव्या हाताने लाच रक्कम स्विकारून त्याच्या पन्टच्या पुढील बाजुस असलेल्या डावे खिशात ठेवली. त्यानंतर मी, पोनि श्री. बागुल व सापळा पथकास लाच स्विकारले बाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. ती वेळ अंदाजे 17/04 वाजेची होती. त्यानंतर पोनि श्री. बागुल व सापळा पथकाने लिपीक श्री. रणजित गुशिंगे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पंच श्री.सुनिल ओसवाल यांचेकरवी लिपीक श्री.रणजित गुशिंगे यांनी परिधान केलेल्या पन्टच्या पुढील बाजुस असलेल्या डावे खिशात असलेली अन्थ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. 4,000/- हस्तगत करण्यात आली. सदर कारवाई बाबत सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाई पंचनामा पोनि श्री. बागुल यांनी केला आहे. तरी माझे पक्षकार श्रीमती अंजना शेजवळ व श्री.विषाल शेळके यांचे शेतजमीनीचे संदर्भात मा. न्यायालयाने दिलेला हुकुमनामा (आदेश) फाईलिंग करून सुची क्र. 2 काढुन देण्याच्या मोबदल्यात दुय्यम निबंधक कार्यालय, येवला, जि.नाशिक येथील लिपीक श्री.रणजित गुशिंगे यांनी माझ्याकडे दि. 18/05/2022 रोजी पंचांसमक्ष 4,000/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम 17/04 वाजेचे सुमारास लिपीक श्री.रणजित गुशिंगे यांनी दुय्यम निबंधक कार्यालयातील आवक-जावक कबिनमध्ये पंच साक्षीदार यांचे समक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे, म्हणुन माझी श्री.रणजित शिवसिंग गुशिंगे, वय - 36 वर्षे, धंदा - नोकरी, कनिष्ठ लिपीक, दुय्यम निबंधक कार्यालय, येवला, जि. नाशिक, राहणार- श्री. पप्पु खैरणार यांचे घरात खैरणार बिल्डींग, रेणुका माता मंदीराचे पुढे, वल्लभ नगर, बदापुर रोड, येवला, जि.नाशिक यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.माझी वरील संगणीकृत फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे. समक्ष हि फिर्याद दिली दि.19/05/2022

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** BHAGWAN HARIBHAU MATHURE(I (Inspector)) / PCMH79922 **or (किंवा)**
पुढील तपास. पोनिरी श्री. अनिल एम. बागुल नेम. ला.प्र.वि नाशिक

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिकाऱ्याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलिस ठाणे अमलदार

**Signature of Officer In charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): BHAGWAN HARIBHAU MATHU

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PCMH79922



Scanned with CamScanner